# MAHARASHTRA STATE COUNCIL OF EXAMINATION, PUNE

Government Commercial Certificate Examination

**4 JULY, 2018**

[Time : 11-30]

(Total Marks for Sections I and II : 100)

**MARATHI TYPEWRITING**

(30 Words Per Minute)

**SECTION - I**

**(Time Allowed : 1 Hour)**

**मराठी टंकलेखन**

(३० शब्द प्रति मिनिट)

**विभाग - १**

(वेळ : १ तास)

---

**प्र.1)** पुढील पत्र आकर्षक पद्धतीने टंकलिखित करा : **[गुण : ३०]**

**मे. मॉर्डन इलेक्ट्रिक्स शॉपी**

६१५/६, सोनार बाझार लेन,

गांधी चौक,

खडकी, पुणे - ०३

संदर्भ क्रमांक : ऑर्डर/७१६-२० दिनांक : आजची टाका

प्रति,

श्री जगदंबा माता स्वीटस् शॉप,

शॉप नं. १२, विश्व कॉम्प्लेक्स,

आळंदी रोड,

विश्रांतवाडी, पुणे - ६

विषय : मिठाईची गुणवत्ता तपासणीबाबत...

संदर्भ : आपले दरपत्रका विषयीचे पत्र क्रमांक : दर/७२-२०...

महोदय,

आपले वरील संदर्भांकित पत्र व दरपत्रक मिळाले. आपले दरपत्रक आमच्या पसंतीस आले असून, मिठाईची गुणवत्ता तपासणी करण्यास पुढील आठवड्यात आमचे प्रतिनिधी आपल्या मिठाई शॉपला भेट देतील.

आपल्या मिठाईची गुणवत्ता तपासणे म्हणजे आपल्यावर अविश्वास दाखवणे आहे, असे अजिबात समजू नये. केवळ आमच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांची, आप्तेष्टाची, मित्रपरिवाराची पसंती लक्षात घेऊन आम्ही ही गुणवत्ता तपासणी करणार आहोत.

तरी, कृपया आपण या गुणवत्ता तपासणी बाबत गैरसमज करून घेऊ नये. ही केवळ एक औपचारिकता आहे. आणि आम्हांस खात्री आहे की आपल्याकडील गुणवत्ता तपासणीचा अहवाल सकारात्मक असणार आहे. आपले सहकार्य अपेक्षित आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

व्यवस्थापक,
मेसर्स मॉडर्न इलेक्ट्रिक्स् शॉपी

सोबत : काही नाही.

**प्र.2)** पुढील रकाना टंकलिखित करा. रकान्याच्या ओळी टंकलेखन यंत्रावर अथवा शाईने आखा. दर्शकबिंदू आवश्यक आहेत. **[गुण : ३०]**

**महाराष्ट्र राज्य सरकारने पुणे शहरात नाले सफाई कामावर केलेला खर्च**

**[आकडे लाखात]**

| अनु. क्रमांक | ठिकाणे | वर्ष २०१०-११ | वर्ष २०११-१२ | वर्ष २०१२-१३ |
|---|---|---|---|---|
| १. | मुकुंदनगर .. | ७,१९२ | ९१६ | ७,८९८ |
| २. | विद्यानगर .. | ३,०२६ | १९२ | ४,१०२ |
| ३. | कर्वेनगर .. | ८,२९० | ३,०२६ | ८,१०२ |
| ४. | कोरेगाव पार्क .. | २,०१७ | ६,१०२ | ६,१०२ |
| ५. | विश्रांतवाडी .. | ७,१०२ | ३,०१६ | ८,१९२ |
| ६. | हडपसर .. | ३,०१६ | ८,२०१ | ३,१०२ |
| ७. | पद्‌मावती .. | ७२५ | ३,०२५ | ९१५ |
| ८. | कात्रज .. | २,०१७ | २८३ | ९,१९२ |